**नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६**

**सरकार वि. दादासाहेब वगैरे व इतर**

**निशाणी क्र. ६५**

**दि. ०३/०४/२०२५**

**नि. ६७ वरील आदेशान्वये शपथेवर उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.डी.व्ही.शिंदे यांचेमार्फत सुरू**

**०२.** मी गोमेवाडी येथे जन्मापासून राहतो. माझे शिक्षण बारावी डी.एड पर्यंत झाले आहे. मी महा ई सेवामध्ये नोकरीस होतो माझ्या कामाची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ५.०० अशी होती. आशिष सोहनी व विक्रम देवकुळे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विक्रम देवकुळे हा माझ्या भावकीतील आहे. हे म्हणणे खरे आहे की, दुसरा पंच अजय सोहनीच्या भावकीतील आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व सोहनी एकाच समाजातील आहोत.

**०३.** दि. १७/९/२०१६ रोजी आम्ही तेथे असतांना पोलीस आणि आशीष सोहनी व विक्रम यांनी मला पंचनामेसाठी बोलावले होते. मला पोलीसांनी बोलावलयानंतर मी त्यांचेकडे चौकशी केली नाही की, काय काम आहे, कामाला किती वेळ लागेल. असे घडले नाही की,पोलीसांनी आम्हांला सांगितले की,एक चाकू सापडला आहे व तो जप्त करून पंचनामा करायचा आहे.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की,गणपती मंदीर हे गावाच्या मध्यभागी असून जुन्या बाजारपेठमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की,गणपती मंदीरासमोर डांबरी रस्ता पुर्वपश्चीम चालीचा असून त्यापलीकडे आबासाो जाधव यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की,आबासो जाधव यांच्या घराला लागून देशपांडे यांचे घर व इतर लोकांची घरे व दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गणपती मंदीराच्या बाजूला मुगाबाई घाडगे, चंद्रकांत जगदाळे व इतरांची लागून लागून घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या लोकांच्या दारात उभारल्यानंतर गणपती मंदीराचे प्रवेशद्वार आणि रस्त्यावरून कोण येत जात आहे, काय चालले आहे हे दिसते. हे म्हणणे खरे आहे की,यात्रेदिवशी संध्याकाळचे वेळी तो रस्ता गर्दीने भरलेला असतो.

**०५.** माझ्या म्हणण्याप्रमाणे गणपती मंदीराच्या पाय–याच्याजवळ चाकू पडलेला होता. असे घडले नव्हते की, मी जाण्यापुर्वी पोलीसांनी घटनास्थळ दो–या लावून आरक्षीत केले होते व बंदोबस्त लावला होता. तथाकथीत पंचनामेच्यावेळी पोलीसांनी घटनास्थळावर रक्त सांडल्याचे मला दाखविले नव्हते. असे घडले होते की, पंचनामेच्यावेळी चाकूवर रक्ताचे डाग मी पाहीले होते. असे झाले होते की,पंचनामा झाल्यानंतर मी वाचून त्यावर सही केली होती. पंचनामेवर सही करण्यापुर्वी पंचनामेतील मजकूर वस्तुस्थीतीप्रमाणे आहे किंवा नाही याची खात्री मी केली होती. हे मला सांगता येणार नाही की,मी जसे चाकूवर रक्ताचे डाग पाहीले होते तसे पोलीसांनी देखील पाहीले होते किंवा कसे. हे मला माहीत नाही की, चाकू जप्त करताना पोलीसांनी चाकूचे व्यवस्थीत निरीक्षण केले होते किंवा कसे. हे मला आठवत नाही की, सही करण्यापुर्वी चाकूवर रक्ताचे डाग होते असा मजकूर पोलीसांनी पंचनामेत लिहीला होता किंवा कसे. पंचनामेवर सही करण्यापुर्वी माझी पंचनामेवरील मजकूराबाबत काही तक्रार होती असे मला वाटले नाही. असे घडले नाही की, जप्त

**नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६**

**सरकार वि. दादासाहेब वगैरे व इतर**

**निशाणी क्र. ६५**

केलेल्या चाकूवर लाखी सील लावून जप्त केला होता. असे घडले नाही की, जप्त केलेला चाकू कोणत्या पध्दतीने जप्त केला याबाबतचा मजकूर पंचनामेत लिहीला होता. मला पोलीसांनी अंदाजे आठच्या आसपास बोलावले होते.

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, दि. १७/०९/२०१६ रोजी मला पंचनाम्यासाठी बोलाविले होते, मी पंचनाम्यासाठी गोमेवाडी गावातील गणपती मंदीरासमोर गेलो होतो, माझ्यासोबत दुसरे पंच अजय कोंडीबा सोहनी हे होते, ज्याठिकाणी भांडण झाले होते त्याठिकाणचा पंचनामा करायचा होता आणि त्याठिकाणी चाकू पडला होता त्याचा पंचनामा करायचा होता, आम्ही, पोलीस आणि आशिष सोहनी व विक्रम देवकुळे असे त्याठिकाणी गेलो, तेथे एक चाकू पडला होता, पोलीसांनी तो चाकू आम्हाला दाखविला व आम्ही तो जप्त केला, त्यानंतर पंचनामा केला, नकाशा तयार केला, नकाशा आणि पंचनाम्यावर आम्ही सह्या केल्या, जप्त केलेल्या चाकूवर आमच्या सह्यांच्या चिठ्ठया लावण्यात आल्या असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की,आर्टीकल अ प्रमाणे चाकू बाजारात मिळतात. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ वर तो ओळखून यावा अशी विशीष्ठ खून, निशाण नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामेच्यावेळी पोलीसांनी आर्टीकल अ वरील चाकू जप्त केला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी विक्रम देवकुळे व आषीश सोहनीच्या सांगण्यावरून पंचनामेवर सहया केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे सांगणेवरून त्यांना मदत करण्याकरीता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.03.05 10:32:12 +0530

दि. ०४/०३/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी